# नाईक फार्मसी महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्ह्यूला प्रतिसाद

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ३० : क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्था संचलित औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय व रिसर्च सेंटर येथे निव्होकेअर फार्मासुटिकल्सतर्फे कॅम्पस इंटरव्ह्यू घेण्यात आला. या वेळी ११ पदांसाठी विविध महाविद्यालयातील ४९ विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. यापैकी आठ विद्यार्थी दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरले आहेत.

औषधनिर्माणशास्त्र हा शैक्षणिक क्षेत्राचा महत्त्वाचा व अविभाज्य भाग आहे. त्यामुळे या क्षेत्राकडे विद्यार्थी व पालकांचा कल वाढला असल्याचे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश दरेकर यांनी व्यक्त केले. संस्थांनी तसेच विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीला किमान वेळ देणे गरजेचे असून त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न गरजेचे असल्याचे प्रतिपादन निव्होकेअर फार्माचे संचालक तुषार महाजन यांनी केले.

अंगी असलेले गुण व कौशल्यांचा विद्यार्थ्यांनी योग्य पद्धतीने वापर करण्याचे आवाहन केले. प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये उपस्थित विद्यार्थ्यांच्या मुलाखती निव्होकेअर फार्माचे उत्तर महाराष्ट्र व्यवस्थापक नीलेश मोरे, नाशिक विभागीय व्यवस्थापक सतीश बागूल, प्रकल्प व्यवस्थापन विभागाच्या व्यवस्थापिका दिव्या जाधव यांनी घेतल्या. संस्थेचे अध्यक्ष पंढरीनाथ थोरे, सचिव हेमंत धात्रक आदींनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्लेसमेंटचे नियोजन व पाचारण संस्थेचे प्लेसमेंट अधिकारी प्रा.अमोल पाटील, प्रा. घनश्याम ठाकूर यांनी केले.



**नाशिक : व्ही. एन. नाईक औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात सुरू असलेला कॅम्पस इंटरव्ह्यू.**

04/03/2022